शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच

संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे


## ➢ कार्यअहवाल : सन २०२१

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**

**संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree





## दिनांक ३ जानेवारी २०२१
## उस्मानाबाद येथे सावित्रीमाई फुले जयंती साजरी

उस्मानाबाद जिल्ह्यातील उपळे (मा) येथील रयत शिक्षण प्रसारक संस्थेचे हरिभाऊ घोगरे हायस्कूलमध्ये सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी हायस्कुलला भारतीय संविधानाची प्रस्ताविका भेट देण्यात आली.यावेळी ग्रामीण भागातील शाळांची परिस्थिती सुधारण्यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच नेहमी कटिबद्ध असेल.व त्यासाठी विशेष प्रयत्न करेल यासंदर्भात शिक्षकांसोबत चर्चा झाली. यावेळी मुख्याध्यापक देवकते सर,काळे सर,क्षिरसागर सर,गायकवाड सर,मेंदाड सर,गाढवे सर,साखरे सर तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सरव महासचिव संतोष शिंदे उपस्थित होते.






**दिनांक ३ जानेवारी २०२१**

**शिरूर येथे सावित्रीमाई यांची जयंती साजरी**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थच्या वतीने शिरूर येथील संपर्क  कार्यालयात सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी क्रांतीजोती सावित्रीमाईंना जयंतीनिम्मित अभिवादन करताना शिरूर तालुका पदाधिकारी



**दिनांक ३ जानेवारी २०२१**

मावळ तालुक्याच्या वतीने क्रांतीजोती सावित्रीमाईंना जयंतीनिम्मित अभिवादन करताना मावळ तालुका पदाधिकारी










## दिनांक ३ जानेवारी २०२१
## कल्याण  तालुक्याच्या वतीने क्रांतीजोती सावित्रीमाईंना जयंतीनिम्मित
## गुणवंत विद्यार्थी सत्कार व महिलांचा सत्कार

आंबेडकर कॉलनी मित्रमंडळ व रयत विद्यार्थी विचार मंच कल्याण तालुक्याच्या वतीने मा.तालुका अध्यक्ष  अमर शोभा श्याम मुनेश्वर  व त्यांची संपूर्ण टीम यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.तसेच यावेळी दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले.तसेच मान्यवरांच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन  देखील करण्यात आले. त्याच बरोबर महिला शिक्षण दिनानिमित्त परिसरातील उपस्थित महिलांचा पणती आणि गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.ज्योती खांडेकर ( शिक्षिका ) होत्या. त्याचबरोबर मा.समीर ढेकळे ( डॉक्टर ) आणि मा.दयानंद प्रजापती ( वकील ) उपस्थित होते.










एकच ध्यास विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास
(महाराष्ट्र राज्य)
शिरूर(तालुका)






**दिनांक ४ जानेवारी २०२१**

**शिरूर तालुका संपर्क कार्यालयाचे उत्साहात उदघाटन संपन्न**

शिरूर तालुक्यात रयत विद्यार्थी विचार मंच चे संपर्क कार्यालयाचे उदघाटन समारंभ संपन्न , संस्थापक अध्यक्ष- धम्मराज साळवे सर,सभापती संगीताताई मल्लाव, उर्दू हायस्कुल प्राचार्य फारूक सर ,प्रदेश महासचिव संतोष शिंदे ,शिरूर तालुका अध्यक्ष समीर काझी यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले . यावेळी पुणे जिल्हा उपाध्यक्ष अजय यादव, मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे ,सदस्य विक्रांत शेळके शिरूर तालुका पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.



**दिनांक ०५ जानेवारी २०२१**

**संविधान प्रास्ताविक भेट**

माध्यमिक शिक्षण मंडळपिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यलयात संविधानाची प्रस्ताविका लावण्यात यावी याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच वतीने प्रतिमा भेट देताना संस्थापक अध्यक्ष - धम्मराज साळवे






दिनांक ०५ जानेवारी २०२१

पालकांची लूट करणाऱ्या व RTE प्रवेश नाकारणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करण्यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण अधिकारी यांना भेटून निवेदन दिले.



### ०६ जानेवारी २०२१

विभागातील योजनेला अर्ज करण्यास १५ दिवसांची मुदत वाढ देण्यात यावी याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच आणि बहुजन संघटक यांच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विभागाला निवेदन.



कार्यालयीन प्रस्ताव. दि.२८/१२/२०२०

विषय: - सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता विविध कल्याणकारी योजनांच्या अर्ज स्विकृतीकामी मुदतवाढ देणेबाबत.....

मा.स.सादर,

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यासाठी अर्ज वाटप आणि स्विकृतीस १५ जानेवारी २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय महिला बालकल्याण समितीच्या दि.२४/१२/२०२० रोजी झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

### दिनांक ०६ जानेवारी २०२१

रयत विद्यार्थी विचार मंच आणि बहुजन संघटक यांच्या मागणीला यश,पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विभागातील योजनाला अर्ज करण्यास १५ दिवसांची मुदत वाढ देण्यात आली.






**दिनांक ०७ जानेवारी २०२१**

**वृद्ध महिलेला रुग्णालयात दाखल करण्यासाठी मदत**

रयत विद्यार्थी विचार मंच शिरूर टीमच्या प्रयत्नामुळे वृद्ध महिला पुष्पा ज्ञानेश्वर खोले राहणार शिरूर यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, वयोवृद्ध व मानसिक रुग्ण असल्याने एकाच जागेवर बसून होत्या अनेक अडचणी असल्याने त्यांना रयत विद्यार्थी विचार मंच शिरूर टीमने पुढाकर घेऊन ससून रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केले.



**शिरुर येथील रयत विद्यार्थी मंचातर्फे वृध्द महिलेस उपचारासाठी मदत**

शिरुर : रयत विद्यार्थी विचार मंचाच्या प्रयत्नामुळे वृद्ध महिला पुष्पा ज्ञानेश्वर खोले राहणार शिरूर यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, वयोवृद्ध व मानसिक रुग्ण असल्याने एकाच जागेवर बसून होत्या अनेक अडचणी असल्याने त्यांना रयत विद्यार्थी विचार मंच शिरूर तालुका ने पुढाकर घेऊन ससून रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केले व संस्थेमार्फत अनेक अडचणी सोडवण्याचा आम्ही प्रयत्न करु असे आश्वासन शिरूर तालुका अध्यक्ष समीर काझी यांनी बोलताना सांगितले.

दिनांक ०८ जानेवारी २०२०







**दिनांक १० जानेवारी २०२१**

रयत विद्यार्थी विचार मंच मावळ च्या वतीने कार्यकारणी बैठक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तळेगाव येथील बंगल्यावर घेण्यात आली. तसेच यावेळी शैक्षणिक प्रश्नांनावर चर्चा करण्यात आली. तसेच शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षिका वृषाली ताई कदम यांना मावळ तालुका समन्वयक व कु.श्रुतिका विश्वनाथ कांबळे यांना तळेगाव शहर प्रमुख अशी जबाबदारी मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे यांनी दिली. यावेळी मावळ तालुका उपाध्यक्ष सागर गायकवाड, सचिव आरती वाघमारे,कार्याध्यक्ष पूजा गायकवाड, संघटक विकी वाघमारे, सदस्य विक्रांत शेळके, adv.राधाताई अरविंद कलापुरे, सदस्य रुपेश मुळे, आदी जन उपस्थित होते.





**दिनांक ११ जानेवारी २०२१**

कविवर्य  दत्तात्रय जगताप सर उपाध्यक्ष पदविधर शिक्षक संघटना शाखा शिरूर ऑडिटर~शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्था .प्रकाशित पुस्तके 'लांझ्या',मनपाखरू,गुरूविण नाही..! दत्तात्रय जगताप सर* यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संपर्क कार्यालय शिरूर ला भेट देऊन मार्गदर्शन केले.व संस्थेचा कार्यावरती कविता तयार करून पदाधिकारी यांना प्रोत्साहित केले.



**दिनांक १२ जानेवारी २०२१**

**राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आज संपर्क कार्यालय पिंपरी या ठिकाणी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.



दिनांक १२ जानेवारी २०२१

**उर्दू शाळा यांच्या समस्या संदर्भात** पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर उषा माई ढोरे ,सत्तारूढ पक्षनेते नामदेवराव ढाके यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे महासचिव संतोष आणि पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष अकिल मुजावर यांनी निवेदन देऊन लक्ष वेधले यावेळी तात्काळ यावर आदेश देऊ असे महापौर यांनी आश्वासन दिले.





**दिनांक १२ जानेवारी २०२१**

**राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती**

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य मावळ तालुक्याच्या वतीने राष्ट्रमाता राजमाता मासांहेब जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली व सर्वप्रथम संविधान प्रस्ताविकेचे वाचन करून माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मावळ तालुका उपाध्यक्ष सागर गायकवाड, सचिव आरती वाघमारे, संघटक विकी वाघमारे, कार्याध्यक्ष पूजा गायकवाड, तळेगांव संघटक सुशांत म्हस्के तळेगांव संयोजक ऋतिक लोखंडे, सदस्य रुपेश मुळे आदी जन उपस्थित होते...









**दिनांक १७ जानेवारी २०२१**

**रयत विद्यार्थी विचार मंच मावळ च्या वतीने  मकर संक्रांत साजरी.**

मावळ तालुका कार्याध्यक्ष पूजा ताई गायकवाड यांच्या संकल्पनेतून साते येथील कातकरी वस्ती वर लहान मुलांना खाऊ वाटप करून मकर संक्रात साजरी करण्यात आली त्यावेळी मावळ तालुका प्रमुख-अतुल वाघमारे, सचिव-आरती वाघमारे, तळेगांव शहर प्रमुख- श्रुतिका कांबळे, सदस्य व्याख्याते-विक्रांत शेळके आदी जन उपस्थित होते...

## कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाईची मागणी



अतिरिक्त आयुक्त अजित पवार यांना मागणीचे निवेदन देताना धम्मराज साळवे.

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम करणाऱ्या कामगार मजुरांना कसल्याही प्रकारची सुरक्षा साधने पुरवण्यात आलेली नाहीत. कामगारांना दुखापत होण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे मजुरांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे करण्यात आली आहे. याबाबत संघटनेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी अतिरिक्त आयुक्त अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्व. वायसीएम रुणालय विस्ताराचे व विकसनाचे काम सुरु असून बांधकाम करताना कामगारांना, मजुरांना कसल्याही प्रकारचे सुरक्षा साधने पुरवण्यात आलेली नाहीत. सर्व मजूर कोणत्याही सुरक्षा साधनाशिवाय काम करत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.कामगारांना सेफ्टी बूट, हेल्मेट, हातमोजे देण्यात आलेले नाहीत. सदर कामगारांना कोणत्याही प्रकारची दुखापत झाल्यास अथवा जीवित हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी महापालिकेची असेल. कोणताही मजूर सुरक्षा साधनांच्या कमतरतेमुळे जीवित हानी झाल्यास सदर ठेकेदारावर आणि महानगरपालिकेवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल होऊ शकतो.

My Pimpri Edition
Jan 19, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

## सुरक्षा साधनांशिवाय 'वायसीएम'च्या इमारतीचे बांधकाम

**मजुरांचा जीव धोक्यात : चौथ्या मजल्यावर धोकादायक पद्धतीने काम**



पिंपरी : सुरक्षेची साधने न पुरविता ठेकेदाराकडून वायसीएमच्या विस्तारित इमारतीचे मजुरांकडून धोकादायक पद्धतीने काम करून घेतले जात आहे.

**पिंपरी, दि. २० (प्रतिनिधी)** - पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयाच्या विस्तारित इमारतीचे काम सुरु असून, ठेकेदाराकडून मजुरांना कोणतीही सुरक्षा साधने पुरविली जात नाहीत. त्यामुळे महापालिकेची अवस्था दिव्याखाली अंधार अशी झाली आहे.

स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे विस्ताराचे व विकसनाचे काम सुरु असून ते प्रगतीपथावर आहे. हे बांधकाम जुन्या इमारतीवर सुरु आहे. मात्र हे बांधकाम करण्यात येत असताना काम करणाऱ्या बांधकाम मजुरांना ठेकेदाराने कोणत्याही प्रकारची सुरक्षा साधने पुरविली नाहीत. करोनानंतर काम मिळाल्याने हे मजूर जीव धोक्यात टाकून रोजंदारीसाठी धोकादायक पद्धतीने काम करत आहेत. चौथ्या मजल्यावर धोकादायक पद्धतीने काम सुरु असल्याचे छायाचित्र पुराव्यादाखल रयत विद्यार्थी विचार मंचने महापालिका प्रशासनाला सादर केले आहे. सुरक्षा साधनाशिवाय काम करत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कामगारांना सेफ्टी बूट, सेफ्टी हेल्मेट, हातमोजे पुरविलेले नाहीत. काम करताना या कामगारांना कोणत्याही प्रकारची दुखापत अथवा जीवित हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी महापालिकेची असेल, कोणताही मजूर सुरक्षा साधनांअभावी जीवित हानी झाल्यास या ठेकेदारासह महापालिकेवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल होऊ शकतो. याप्रकरणी ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या ठेकेदारावर कारवाई करुन, सर्व मजुरांना सुरक्षा साधने पुरवण्यात यावेत. तसेच सर्व मजुरांचे जीवन विमा काढण्यात यावा अशी मागणी या निवेदनात केली आहे. या निवेदनावर धम्मराज साळवे व संतोष शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रभात Thu, 21 January 2021
https://epaper.eprabhat.net/c/57863670

दिनांक १८ जानेवारी २०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाच्या इमारतीच्या विस्तारीकरणाचे कामकाज सुरु असून ठेकेकदारांकडून मजुरांना कोणतीही सुरक्षा पुरविली जात नाही म्हणून रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड अतिरिक्त आयुक्त अजित पवार यांना निवेदन देऊन लक्ष वेधले.











## दिनांक २६ जानेवारी २०२१

## रयत विद्यार्थी विचार मंच मावळच्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरा.

समाजात काम करत असताना कायदा व सुव्यवस्था राखनाऱ्या यंत्रणेचे आपल्याला मार्गदर्शन व सहकार्य राहून मैत्रीपूर्ण संबंध दृढ व्हावेत या उद्देशाने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रयत विद्यार्थी विचार मंच मावळ च्या वतीने तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. भास्कर जाधव सर, वडगांव पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक मा. सुरेश निंबाळकर सर, कामशेत पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक मा. अरविंद चौधरी तसेच लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक मा.एस.बी. घोरपडे सर यांचा सत्कार करण्यात आला या सर्व मान्यवरांकडून आम्हाला कौतुकाची थाप मिळाली व पुढील वाटचालीस सूचनापर शुभेच्छा मिळाल्या.

पथनाट्यांचे आयोजन केले होते.

### इंदोरीत वृक्षारोपण

**इंदोरी** : कोरोनाचा प्रभाव कमी झाला असला, तरी विद्यार्थ्यांशिवाय मोजके ग्रामस्थ, शिक्षक व शासकीय कर्मचारी यांच्या उपस्थिती होती. मुख्य चावडी चौकातील ध्वजवंदन सरपंच कीर्ती पडवळ यांचे हस्ते; तर ग्रामपंचायत कार्यालयातील ध्वजवंदन उपसरपंच बाळकृष्ण पानसरे यांचे हस्ते झाले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ध्वजवंदन विक्रम पवार व नितीन ढोरे यांचे हस्ते, प्रगती विद्यालयात माजी सभापती विठ्ठलराव शिंदे यांचे हस्ते, सरस्वती प्राथमिक शाळेत प्रशांत ढोरे व दामोदर शिंदे यांचे हस्ते, पानसरे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सोनल सूर्यवंशी, तर कुंडमळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक सुरेश गोकुळे यांचे हस्ते ध्वजवंदन झाले. चैतन्य इंटरनॅशनल स्कूलमध्ये पंढरपूरचे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर विश्वस्त शिवाजी महाराज मोरे यांचे हस्ते ध्वजवंदन व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी सिद्धेश्वर सोनवणे, ज्योती चौहान, मनीष शिरसाट, आवेश मुलाणी, चांदणी खान यांनी मनोगत व्यक्त केले. भगवान शेवकर, हेमलता खेडकर, मनोहर भेगडे, अर्चना घोगरे, दिव्या चटर्जी उपस्थित होते.

### पोलिसांचा सन्मान

**कामशेत** : रयत विद्यार्थी विचार मंच मावळतर्फे तालुक्यातील पोलिस ठाण्यात जाऊन अधिकाऱ्यांचा सन्मान केला. तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक भास्कर जाधव, वडगावचे निरीक्षक सुरेश निंबाळकर, कामशेतचे निरीक्षक अरविंद चौधरी, तसेच लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्याचे निरीक्षक एस. बी. घोरपडे यांचा संविधान प्रास्ताविका भेट देऊन सत्कार केला. मंचाचे अजय यादव, अतुल वाघमारे, सागर गायकवाड, आरती वाघमारे, विकी वाघमारे, पूजा गायकवाड, निखिल यादव, श्रुतिका कांबळे, विक्रांत शेळके, श्रीधर कांबळे, रूपेश मस्तूद उपस्थित होते.

### विवेकानंद स्कूल

**तळेगाव स्टेशन** : स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये श्री डोळसनाथ महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे आणि रोटरी क्लब ऑफ तळेगाव एमआयडीसीचे संस्थापक अध्यक्ष संतोष खांडगे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. रजनीगंधा खांडगे, दादासाहेब उऱ्हे, बाळासाहेब शिंदे, सुदाम दाभाडे, विलास काळोखे, रामराव जगदाळे, सूर्यकांत ओसवाल, दीपक बीचे, जयश्री जोशी, सचिन कोळवणकर, विल्सन सालेर, राहुल खळदे, शंकर हदिमनी उपस्थित होते. शमशाद शेख आणि शिक्षकांनी नियोजन केले. दहावीतील विद्यार्थिनी कुमारी गायत्री माने हिने सूत्रसंचालन केले.





**दिनांक २६ जानेवारी २०२१**

**सर्व भारतीयांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा**

प्रजासत्ताक दिनानिमित्त खराळवाडी उर्दू प्राथमिक शाळा येथे ध्वजारोहण करण्यात आले यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी शुभेच्छा देताना प्रमुख उपस्थिती नगरसेविका गीता मंचरकर ,माजी नगरसेविका अमिना पानसरे, एम आय एम पक्ष प्रदेश महासचिव अकिल मुजावर ,मुख्याध्यापिका अरेफा शेख व इतर मान्यवर





**दिनांक २७ जानेवारी २०२१**

**रयत विद्यार्थी विचार मंच मावळ ऐतिहासिक बुद्धलेणीस भेट**

मावळ तालुक्यात विविध ऐतिहासिक ठिकाण आहे आणि मावळ मधला तो इतिहास आपल्याला माहिती असावा आणि ऐतिहासिक वास्तू जपून ठेवावी या उद्देशाने २६ जानेवारी २०२१ या दिवशी भाजे लेणी येथे भेट दिली. यावेळी टीम ABCPR मावळ चे लेणी संवर्धक अमर ननावरे सरांनी मार्गदर्शन करून भाजे बौद्ध लेणी या संदर्भात ऐतिहासिक माहिती दिली.



दिनांक ०९ फेब्रुवारी २०२१

पिंपरी भाजीमंडई पोलीस चौकीचे कार्यक्षम PSI मा.चाटे साहेब यांचा भारतीय संविधानाची प्रास्तविका देऊन सन्मान करताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व महाराष्ट्र राज्य कमिटी.






## दिनांक १८ फेब्रुवारी २०२१
## विनाअनुदानित शिक्षक आंदोलन
## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचा जाहीर पाठिंबा

मुंबई आझाद मैदान येथे सुरु असलेल्या विनाअनुदानित शिक्षकांच्या आंदोलनाला रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने जाहीर पाठिंबा असल्याचे पत्रक अमर शोभा श्याम मुनेश्वर ( प्रदेश सचिव तथा कल्याण तालुका अध्यक्ष ) यांनी दिले. तसेच त्यांचे प्रश्न जाणून घेतले.



दिनांक १९ फेब्रुवारी २०२१

रयत विद्यार्थी विचार मंच लातूर जिल्हा

लातूर जिल्ह्याचे प्रभारी जिल्हाध्यक्ष बागमारु मुन्नवर व त्यांच्या टीमच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.








दिनांक १९ फेब्रुवारी २०२१

रयत विद्यार्थी विचार मंच कल्याण तालुका

छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यागमुर्ती माता रमाबाई आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी





## दिनांक १९ फेब्रुवारी २०२१
## छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

रयत विद्यार्थी विचार मंच मावळ च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी केली. यावेळी मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे यांनी स्त्री अत्याचार जर थांबवायचे असेल तर खऱ्या अर्थाने महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांच्याच न्हवे तर सर्व तरुणांच्या मनावर बिंबवले पाहिजे असे मत व्यक्त केले, तसेच रयत विद्यार्थी विचार मंच सदस्य,राज्यस्तरीय युवा व्याख्याते विक्रांत शेळके यांनी व्याख्यान रुपी शिवचरित्राचे दर्शन घडविले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच पुणे जिल्हा उपाध्यक्ष अजय यादव, मावळ उपाध्यक्ष सागर गायकवाड, मावळ सचिव आरती वाघमारे, मावळ कार्याध्यक्ष पूजा गायकवाड, तळेगांव दाभाडे शहर प्रमुख श्रुतिका कांबळे, नवनियुक्त तळेगांव शहर संयोजक श्वेता पडवळ, तळेगांव दाभाडे. संघटक शिवानी नरवडे, तळेगांव दाभाडे. सहसंघटक पूजा नरवडे, सौ. रंजीता विश्वनाथ कांबळे, मेहूल ननावरे आदीजन उपस्थित होते.



दिनांक २३ फेब्रुवारी २०२१

कोरोनाकाळातील मानधन तत्वावर सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना मानधन तत्वावर कायमस्वरूपी सामावून घेण्यात यावे यासाठी कोरोना योद्धा बचाव कृती समितीच्या वतीने गेली १२ दिवस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समोर आंदोलन चालू आहे.या आंदोलनास रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांच्या आदेशानुसार पाठिंबा देण्यात आला.यावेळी संस्थेचे राज्य महासचिव संतोष शिंदे,राज्य सचिव नीरज भालेराव,पिंपरी चिंचवड शहर संघटक अमोल गायकवाड,शहर समनव्यक प्रमोद लोंढे,भोसरी विभाग प्रमुख मयूर जगताप,आयुश करमले उपस्थित होते.

दिनांक २४ फेब्रुवारी २०२१



संक्षिप्त

रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

## संत गाडगेबाबा यांना अभिवादन

पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य व पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने पिंपरी संपर्क कार्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महासचिव संतोष शिंदे व सचिव नीरज भालेराव यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी प्रदेश महासचिव संतोष शिंदे, प्रदेश सचिव नीरज भालेराव, शहर संघटक अमोल गायकवाड, शहर समन्वयक प्रमोद लोंढे, भोसरी विभाग प्रमुख मयूर जगताप, सदस्य आयुष्य करमले उपस्थित होते.











## दिनांक २७ फेब्रुवारी २०२१

## रयत विद्यार्थी विचार मंच सातारा जिल्हा मराठी भाषा दिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य च्या वतीने मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून केदार हायस्कुल सुपने तालुका कराड जिल्हा सातारा गोर गरीब गरजु वंचित विद्यार्थ्यांना वह्या व पेन वाटप करण्यात आले या वेळी रयत विद्यार्थी विचार मंचचे सातारा जिल्हाध्यक्ष अक्षय चव्हाण, जिल्हा सचिव- मोहम्मदजैद मोमीन,जिल्हा-महासचिव- सागर घोडके,जिल्हा-संपर्कप्रमुख-अक्षय सुतार,कराड तालुका उपाध्यक्ष- हर्षवर्धन पाटील, उंब्रज विभाग प्रमुख तथा अध्यक्ष- विराज पाटील उपस्थित होते. सर्व पदाधिकार्यांच्या व सर्व शिक्षकांच्या उपस्थिती मध्ये वह्या व पेन चे वाटप करण्यात आले यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती राजश्री पाटील यांच्याकडुन व सर्व शिक्षकांकडुन पदाधिकार्यांचे स्वागत करण्यात आले.





## दिनांक २७ फेब्रुवारी २०२१
## संत रोहिदास जयंती

संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर, महासचिव संतोष शिंदे,पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष समाधान गायकवाड उपस्थित होते.

विषय :-जळगाव आशादीप वस्तीगृहात झालेल्या निंदनीय प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शासन करणेबाबत Add label

RAYAT VIDYARTHI VI... 13:58
to cm, deshmukhav09

प्रति,
१)मा.मुख्यमंत्री साहेब
महाराष्ट्र राज्य मुंबई
2) मा.गृहमंत्री साहेब
महाराष्ट्र राज्य मुंबई

विषय :-जळगाव आशादीप वस्तीगृहात झालेल्या निंदनीय प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शासन करणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्रातील जळगावमध्ये अतिशय धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शासनाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या वसतीगृहातील महिला आणि मुलींवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. वसतीगृहातील या महिलांना आणि मुलींना कपडे काढून नाचवण्यात येत असल्याचा प्रकार उघडकीस झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे यामध्ये पोलिसांचा देखील समावेश असल्याचं समोर आलं आहे.

शासनाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या महिला आणि बालकल्याण विभागाचे मार्फत निराधार आणि अत्याचार ग्रस्त महिलांच्या मुलींच्या निवासाची आणि भोजनाची व्यवस्था केली जाते. जळगावच्या आशादीप वस्ती गृहातील महिला आणि मुलींना पोलिसांनी आणि अज्ञात व्यक्तींनी पैसे काढून नाचविण्यात आल्याची तक्रार या महिलांनी शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांकडे केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

या घटनेच्या संदर्भात महिलांनी वसतीगृहाच्या खिडकीतून बोलतांना आपल्यावर अन्याय अत्याचार केला जात असल्याची तक्रार केली आहे. रात्री काही तरुण पैसे घेऊन या ठिकाणी प्रवेश करून अनैतिक कृत्य करीत असल्याचं महिलांनी म्हटलं आहे.

तरी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शासन करावे व जे पोलीस यामध्ये सामील आहेत त्यांना तात्काळ त्यांची पदावरून हकालपट्टी करण्यात यावी व त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी अशी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आपणास विनंती करत आहोत.

आपला विश्वासू
संतोष शिंदे
प्रदेश महासचिव
रयत विद्यार्थी विचार मंच
8087540384

## दिनांक ०३ मार्च २०२१

जळगाव आशादीप वसतिगृहात झालेल्या निंदनीय प्रकारची सखोल चौकशी करून दोषींना तात्काळ कठोर शासन करण्यात यावे यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मा.मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना मेल द्वारे निवेदन देण्यात आले.


संत सेवालाल महाराज यांचा समावेश संतांच्या यादीत करून त्यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी होणेबाबत.

Atul Waghmare 12:40 pm


प्रति,
मा. मुख्यमंत्री साहेब
महाराष्ट्र राज्य मुंबई


विषय : संत सेवालाल महाराज यांचा समावेश संतांच्या यादीत करून त्यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी होणेबाबत. महोदय,

HP Harshwardhan Patil 12:45 pm
cm@Maharashtra.gov.in

प्रति,
मा. मुख्यमंत्री साहेब
महाराष्ट्र राज्य मुंबई

विषय : संत सेवालाल महाराज यांचा समावेश संतांच्या यादीत करून त्यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी होणेबाबत.
महोदय,
बंजारा समाजातील समाज सुधारक संत सेवालाल यांची जयंती झाली. त्यांनी समाजाला क्रांतिकारी विचारांचे दिलेले बोल वास्तववादी विचार करण्यास भाग पाडतात. संत सेवालाल यांनी दिलेल्या सेवाभावाची शिकवण बंजारा समाजाने आपल्या कंठात गीतांच्या रूपाने जपून ठेवली.
गोरबंजारा जमातीमध्ये संत सेवालाल महाराज हे मोठे संत


विषय:- संत सेवालाल महाराज यांचा समावेश संतांच्या यादीत करून त्यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी होणेबाबत

Zaid Momin 12:19 pm

*प्रति,*
*मा. मुख्यमंत्री साहेब*
*महाराष्ट्र राज्य मुंबई*


विषय:- संत सेवालाल महाराज यांचा समावेश संतांच्या यादीत करून त्यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी होणे बाबत

1 message

akshay chavan <akshaychavan23797@gmail.com> Wed, 3 Mar 2021 at 12:18 pm
To: cm@maharashtra.gov.in


(no subject)

1 message

Sameer Kazi <sameerkazi341@gmail.com> Wed, 3 Mar 2021 at 12:38 pm
To: cm@maharashtra.gov.in

प्रति,
मा. मुख्यमंत्री साहेब
महाराष्ट्र राज्य मुंबई

## दिनांक ०३ मार्च २०२१

## संत सेवालाल महाराज

बंजारा समाजातील महान संत श्री. सेवालाल महाराज यांचा समावेश संतांच्या यादीत करून त्यांची जयंती शासकीय स्तरावर व्हावी यासाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकारी यांनी आज मा.मुख्यमंत्री यांना मेल द्वारे निवेदन दिले.





## दिनांक ०५ मार्च २०२१

## अमित आढावला उच्चशिक्षणासाठी सर्वोतोपरी मदत करावी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कल्पना आढाव यांनी अतिशय हालाखीची परिस्थिती असताना आपला  मूलगा अमित आढावला शिक्षण देऊन डॉक्टर केले आहे. आणि पुढे उच्च शिक्षणासाठी त्याला इंग्लड ला जाण्याची संधी देखील निर्माण झाली आहे.परंतु आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे पुढील उच्च शिक्षणासाठी येणारा खर्च हा त्यांच्या आवाक्या बाहेरचा आहे.त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्याच्या शिक्षणाचा खर्च उचलून त्याला उच्चशिक्षणासाठी सर्वोतोपरी मदत करावी या विषयाचे निवेदन मा.महापौर व मा.आयुक्त पिंपरी  चिंचवड महानगरपालिका यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने देण्यात आले.यावेळी संस्थापक अध्यक्ष  धम्मराज साळवे सर ,महासचिव संतोष शिंदे, पिंपरी चिंचवड शहर संघटक अमोल गायकवाड उपस्थित होते.













## दिनांक ०९ मार्च २०२१

## कल्याण तालुक्याच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

या वेळी महाराष्ट्र प्रदेश सचिव अमर मुनेश्वर, कल्याण तालुका अध्यक्ष सोमनाथ पाटील , कल्याण तालुका उपाध्यक्ष रोहीत सोनवणे, शिल्पा सोनवणे, महासचिव निखिल उबाळे , संघटक सूरज ताजणे , सह संपर्क प्रमुख संकेत यशवंते , आणि इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. कल्याण मध्ये कोविड - १९ ची परिस्थिती ( २००+ ) रुग्ण दर दिवस अशी असल्याने एकत्र येऊन कार्यक्रम न घेता समाजातील सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, शासकीय, बिगर सरकारी, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या गृहभेटी घेऊन सन्मान करण्यात आला त्यावेळी एक रोप व प्रमाणपत्र देण्यात आले.







## दिनांक ०९ मार्च २०२१
## जागतिक महिला दिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य च्या वतीने मावळ साई सेवाधाम या ठिकाणी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.महिला दिनाच्या निमित्ताने मावळ तालुक्यातील कर्तव्यदक्ष महिला पोलीस पाटील यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,स्वागताध्यक्ष महासचिव संतोष शिंदे,मार्गदर्शक व्याख्याते श्रीविवेक गुरव सर तसेच कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून पुढील मान्यवर उपस्थित होते.मा. सारिकाताई शेळके ( मा.आमदार सुनील अण्णा शेळके यांच्या पत्नी व कुलस्वामिनी मंच अध्यक्ष ),मा.तृप्तीताई मांडेकर पुणे पोलिस महासंघ अध्यक्ष ) मा.संगीताताई शेळके :- नगरसेविका तळेगाव दाभाडे , मा.सुरेखा शिंदे मॅडम :- PSI कामशेत मा.पुष्पां घूगे मॅडम :- पोलीस नाईक लोणावळा, मा.स्वाती वेदक मॅडम:- साई सेवाधाम ट्रस्ट, मा.शीला खोत मॅडम :- PSI वडगाव मावळ , मा.ज्योती परदेशी मॅडम:-सह.फौजदार तळेगाव, मा.रूपाली कोहिनकर :- पोलीस हवालदार लोणावळा कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन व पूजन करण्यात आले.





## दिनांक १० मार्च २०२१
## जागतिक महिला दिन

रयत विद्यार्थी विचार मंच मावळ च्या वतीने टाटा हाउसिंग सोसायटी मधे सफाई काम करणाऱ्या माझ्या माय माऊल्यांचा आणि मॅजिक बस इंडिया फाऊंडेशन येथील कार्य करत असलेल्या भगिनिंचा जागतिक महिला दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. या वेळी रयत विद्यार्थी विचार मंच मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, मावळ महासचिव युवा व्याख्याते विक्रांत शेळके, मावळ उपाध्यक्ष सागर गायकवाड, मावळ सचिव आरती वाघमारे, मावळ कार्याध्यक्ष पूजा गायकवाड, तळेगांव दाभाडे शहर प्रमुख श्रुतिका कांबळे, तळेगांव शहर सचिव करुणा शिंदे आदी जन उपस्थित होते.









## दिनांक  २१ मार्च २०२१

## रयत विद्यार्थी विचार मंच मावळ तालुका

आज शिवली तालुका मावळ या ठिकाणी परीक्षेला सामोरे जाताना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या वेळी १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेला जाताना काय तयारी करावी , व्यक्तिमत्त्व विकास, स्ट्रेस मॅनेजमेंट या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक इंद्रायणी इंग्लिश स्कूल तळेगांव दाभाडे शिक्षक विशाल मोरे सर यांनी केले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, प्रबोधनकार सागर दादा वाघमारे, ऑल इंडिया ब्ल्यू टायगर अध्यक्ष सचिन वाघमारे आदी जन होते.











## दिनांक २३ मार्च २०२१

मावळ मध्ये अनेक  लोकवस्त्या दुर्लक्षित आहेत जिकडे सरकारचे लक्ष नाही.या वस्त्यावरील मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत.अश्या वस्त्यांवर जाऊन रयत मावळ टीम तेथील लोकांशी चर्चा करत आहेत त्यांचे प्रश्न जाणून घेत आहेत.तसेच तेथील शाळा व त्यांच्या मुख्याध्यापकाला भेट दिली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य करण्यात येईल असे सांगितले. मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, तळेगांव दाभाडे शहर प्रमुख श्रुतिका कांबळे,तळेगांव दाभाडे शहर सचिव करुणा शिंदे, तळेगांव दाभाडे उपाध्यक्ष ओमकार शिवेकर, सदस्य श्रिधर कांबळे, सदस्य रुपेश मस्तुद व सर्व पदाधिकारी रयत विद्यार्थी विचार मंचाच काम तळागाळापर्यंत पोहचवण्याचं काम करत आहेत.









## दिनांक २७ मार्च २०२१

## स्वामी विवेकानंद अकॅडमीला भेट

मा.सुरेंद्र शिंदे यांच्या राजगुरूनगर चाकण येथील स्वामी विवेकानंद अकॅडमीला रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व महासचिव संतोष शिंदे यांनी भेट दिली.उपस्थित विद्यार्थ्यांना धम्मराज साळवे सर यांनी मार्गदर्शन केले.रयत विद्यार्थी विचार मंचाची संकल्पना सांगितली.स्वामी विवेकानंद अकॅडमी व तेथील विद्यार्थी यांच्या सोबत नेहमीच रयत विद्यार्थी विचार मंच असेल असे आश्वासन दिले. यावेळी संचालक सुरेंद्र शिंदे सर व त्यांच्या टीमने सन्मान केला त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार...



दिनांक ११ एप्रिल २०२

रयत विद्यार्थी विचार मंच  मंच संस्थेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिम्मित त्यांच्या प्रतिमेस वंदन करताना प्रदेश महासचिव संतोष शिंदे




**दिनांक ११ एप्रिल २०२१**

**कल्याण तालुक्याच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा फुले जयंती साजरी**

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य कल्याण तालुका कार्यकारिणीच्या वतिने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी राज्य सचिव तथा प्रभारी मुंबई प्रदेशाध्यक्ष अमर शोभा श्याम मुनेश्वर , कल्याण तालुका अध्यक्ष सोमनाथ पाटील ,महासचिव निखिल उबाळे , सचिव चेतन झेंडे ,  संघटक सूरज ताजणे , खजिनदार आकाश लंघे आणि  सहसंपर्क दर्शन कदम उपस्थित होते.





## दिनांक ११ एप्रिल ते १४ एप्रिल

## महात्मा फुले बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिम्मित  वही पेन संकलन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले जयंती निमित्त महापुरुषांना हार फुल अर्पण करण्यापेक्षा शैक्षणिक साहित्य द्यावे असे आवाहन करण्यात आले होते . त्या आवाहनाला प्रतिसाद देत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेला नागरीकांकडून  शैक्षणिक साहित्य देण्यात आले.




## दिनांक १९ एप्रिल २०२१

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वती ने दहावीच्या दोन गरजू विद्यार्थ्यांना दोन डझन वह्यांची मदत करण्यात आली.

दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत मिळणेबाबत. Add label

RAYAT VIDYARTHI VI... 00:42
to gaikwad.varsha3@gmai...

प्रति,
मा.ना.श्री.वर्षाताई गायकवाड
शिक्षणमंत्री,महाराष्ट्र राज्य.

महोदय,

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी दहावीची परीक्षा यंदा रद्द करण्यात आली आहे. आता या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यांकन करण्यात येणार आहे, त्यासाठी निकष ठरविण्यात येत आहेत. परंतु बोर्डाची परीक्षा म्हटली की, प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकांचा मुद्रण खर्च, विद्यार्थ्यांना देण्यात येणारे साहित्य, पर्यवेक्षकांचे माधनधन, भरारी पथकाचा खर्च, असा खर्च बोर्डाला करावा लागतो. यंदा परीक्षा होणार नसल्याने हा खर्च बोर्डाला करावा लागणार नाही.

यंदा परीक्षेसाठी १६ लाखांहुन अधिक विद्यार्थी दहावीची परीक्षा देणार होते. मात्र, आता या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार नाही. मात्र बोर्डाने प्रत्येक विद्यार्थ्यांकडून अंदाजे ४०५ रुपये शुल्क घेतलं आहे. या तुलनेत विचार केला, तर बोर्डाकडे ६६ ते ७० कोटी रुपयांचे शुल्क जमा आहे. परीक्षा होणार नसल्याने हे शुल्क विद्यार्थ्यांना परत मिळावे,अशी विद्यार्थी व पालकांची मागणी आहे.

तरी विद्यार्थी व पालक यांच्या मागणीचा विचार करून आपण विद्यार्थ्यांना लवकरात लवकर शैक्षणिक शुल्क परत करावे ही आपणास नम्र विनंती.

आपला
संतोष शिंदे
प्रदेश महासचिव
रयत विद्यार्थी विचार मंच

दिनांक २७ एप्रिल २०२१

दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत मिळावे याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मा.शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांना मेलद्वारे निवेदन देण्यात आले.

पुढारी

# दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत करा

**पिंपरी :** दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत करा, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने करण्यात आली. शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांना त्याबाबत निवेदन देण्यात आले.

कोरोना संसर्गाच्या दहावीची परीक्षा यंदा रद्द करण्यात आली आहे. आता या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यांकन करण्यात येणार आहे. त्यासाठी निकष ठरविण्यात येत आहेत; बोर्डाची परीक्षा म्हटली की, प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकांचा मुद्रण खर्च, पर्यवेक्षकांचे मानधन, भरारी पथकाचा खर्च, असा खर्च बोर्डाला करावा लागतो. यंदा परीक्षा होणार नसल्याने हा खर्च बोर्डाला करावा लागणार नाही. विद्यार्थ्यांकडून ४०५ रुपये शुल्क आकरले आहे. बोर्डाकडे ६६ ते ७० कोटी रुपयांचे शुल्क जमा आहे. परीक्षा होणार नसल्याने हे शुल्क विद्यार्थ्यांना परत मिळावे, अशी पालकांची व विद्यार्थ्यांची मागणी आहे.

My Pimpri Edition
Apr 28, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in





दिनांक ३० एप्रिल २०२१

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना जयंतीनिम्मित अभिवादन केले.



**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन**

पिंपरी, दि. ३० (प्रतिनिधी) - रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव यांनी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पाहर अर्पण करून अभिवादन केले.

महाराष्ट्रच नव्हे तर देशभर फिरून तुकडोजी महाराजांनी आध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले. ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूत स्वरूपी विचार त्यांनी केला आणि त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही सुचविल्या. या उपाययोजना त्यांच्या काळाला तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या, हे आज तीव्रतेने जाणवते. अशा शब्दांत तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

प्रभात Sat, 01 https:/

दिनांक २१ मे २०२१

पिंपरीतील जय हिंद शाळेत शिकणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांला आज रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली.





दिनांक २६ मे २०२१

कोरोनाने निधन झालेल्या पिंपरी चिंचवड शहरातील पालकांच्या मुलांची शिक्षणाची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घ्यावी,यासंदर्भात मा.आयुक्त राजेश पाटील यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे सर व महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले याची महापालिका आयुक्त यांनी तात्काळ दखल घेतली.



MPC News
3h •

कोविड- 19 आजाराने दोन्ही पालक गमावलेल्या मुलांची माहिती महापालिका संकलित करत आहे. कोरोनामुळे आई आणि वडिल गमावलेल्या बालकांची माहिती देण्यासाठी महापालिकेच्या सारथी हेल्पलाइनच्या 8888006666 या क्रमांकावर किंवा महाराष्ट्र शासनाच्या चाईल्ड हेल्पलाइनच्या 1098 या क्रमांकावरही देता येईल.

MPCNEWS.IN
Pimpri Corona News : कोरोनामुळे पालकांचे छत्र हरपलेल्यांची माहिती द्या; महापालिकेचे आवाहन

**निवेदनाची दखल**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांना कोरोनाने निधन झालेल्या पिंपरी चिंचवड शहरातील पालकांच्या मुलांची शिक्षणाची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घ्यावी या विषयाचे निवेदन देण्यात आले होते त्यांनी या विषयाची तात्काळ दखल घेऊन कार्यवाही केली.



विषय : कोरोनामुळे निधन झालेल्या पालकांच्या मुलांची शिक्षणाची जबाबदारी घेणेबाबत Add label

Santosh Shinde 14:02
to gaikwad.varsha3@gmai...


प्रति,
मा. मुख्यमंत्री / शिक्षणमंत्री
महाराष्ट्र राज्य मुंबई

महोदय,
कोरोना विषाणूने देशात/महाराष्ट्र राज्यात प्रचंड थैमान घातले असून कोरोनाची दुसरी लाट अत्यंत घातक आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. कोरोनाने व लॉकडाउन मुळे बेरोजगारी वाढत आहे.
कोरोनामुळे शिक्षणव्यवस्थेचा पाया खिळखिळा झाला आहे. कोरोनाकाळातील ऑनलाईन शिक्षणव्यवस्था हि फक्त श्रीमंतांची मक्तेदारी होऊन बसली आहे. ज्यांच्याकडे मोबाईल इंटरनेट या सुविधा आहेत तेच विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु सरकारी शाळेतील, झोपडपट्टीतील, व गरिबांची मुले मोबाईल व इंटरनेट अश्या सुविधांअभावी शिक्षणापासून वंचित होत आहेत.
कोरोनामुळे कुटुंबच्या कुटुंब उद्धवस्त होत आहेत,अनेक परिवारातील अनेकांचे आई-वडील,पालक कोरोनामुळे निधन पावले आहेत.अश्या वेळेस आई, वडील, पालक यांच्यावर अवलंबून असणाऱ्या पाल्यांची, मुलांची जगण्याची परवड होत आहे.अश्या वेळेस ही मुले जगण्यासाठी आपले घर चालवण्यासाठी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडतील व कामाला जातील व त्यांचे शैक्षणिक आयुष्य उद्धवस्त होईल. असे होऊ नये याकरिता महाराष्ट्र सरकारच्या वतीने राज्यातील अश्या कुटुंबाचा सर्वे करण्यात यावा. व नवीन योजना तयार करून त्या योजनेद्वारे कोरोनामुळे निधन झालेल्या पालकांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी राज्य शासनाने घ्यावी. हि नम्र विनंती.

आपला
संतोष शिंदे
प्रदेश महासचिव
रयत विद्यार्थी विचार मंच
संपर्क : 9604683459

दिनांक २८ मे २०२१

कोरोनामूळे निधन झालेल्या पालकांच्या मुलांची शिक्षणाची जबाबदारी शासनाने घेणेबाबत या विषयाचे ई-मेलद्वारे निवेदन महाराष्ट्र राज्य मा.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे साहेब व मा.शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने देण्यात आले होते.त्याची तात्काळ राज्यशासनाच्या वतीने दखल घेण्यात आली.



Varsha Gaikwad
18h ·

कोरोनामुळे अनेक मुलांच्या डोक्यावरील आईवडिलांचे छत्र हरपले.पालकांचा आधार न राहिल्याने त्यांच्यासमोर शिक्षणाचा गंभीर प्रश्न उभा आहे. सदर मुलांना बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत व पुढील शिक्षणाची जबाबदारी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्र्यांसमोर मांडला.
CMOMaharashtra
Uddhav Thackeray

शिक्षणमंत्री यांच्याकडून निवेदनाची दखल









**दिनांक ०५ जुन २०२१**

**पर्यावरण दिन**

कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता रयत विद्यार्थी विचार मंच मावळ च्या वतीने कोरोनाच्या नियमांचे पाळून वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा केला..

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे, उपाध्यक्ष सागर गायकवाड, मावळ महासचिव विक्रांत शेळके, मावळ सचिव आरती वाघमारे, मावळ सह-सचिव धनश्री पवार, मावळ संपर्क प्रमुख अक्षय वाघमारे, मावळ सदस्य निखिल यादव, मावळ सदस्य स्नेहा यादव, वडगाव शहर प्रमुख धनश्री पोते यांनी आपापल्या घराभोवती वृक्षारोपण केले.












## दिनांक ०६ जुन २०२१

## छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिवस आणि जागतिक पर्यावरण दिवस

आज दिनांक ६ जुन २०२१ रोजी रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य कल्याण तालुका , ठाणे जिल्हा आणि मुंबई प्रदेश कार्यकारिणी त्याच बरोबर जीवनदीप महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमानाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिवस आणि जागतिक पर्यावरण दिवस जीवनदीप कला , वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय , खर्डी , तालुका शहापूर , जि.ठाणे येथे साजरा केला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. कैलास कळकुटे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमास संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव अमर शोभा श्याम मुनेश्वर , मुंबई प्रदेशाध्यक्ष रोहीत सोनवणे , ठाणे जिल्हा अध्यक्ष सूरज ताजणे , कल्याण तालुका अध्यक्ष सोमनाथ पाटील , उपाध्यक्ष आकाश लंघे , महासचिव निखिल उबाळे आणि सहसचिव संकेत यशवंते आणि नविन सदस्य नदीम शेख आदी उपस्थित होते.





**दिनांक १६ जुलै २०२१**

**वाढदिवसानिम्मित शैक्षणिक मदत**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने वाढदिवसाला केक गिफ्ट अश्या गोष्टींवर खर्च करण्यापेक्षा अनावश्यक खर्च टाळून संस्थेला शैक्षणिक साहित्य द्या अशी संकल्पना राबवली जाते. या संकल्पनेला साथ देत युवा नेते प्रबुद्ध कांबळे यांनी आज त्यांच्या वाढदिवसानिम्मित रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याचे कौतुक करून गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी संस्थेला ३५ डझन वह्या भेट दिल्या.यावेळी त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जलनिती हे पुस्तक भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या..

दिनांक १७ जुलै २०२१

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आज चिंचवड मधील होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत केली..







**दिनांक २२ जुलै २०२१**

**RTE प्रवेश_नाकारणाऱ्या मुजोर शिक्षणसंस्था विरोधात_आंदोलन**

आज पिंपरी चिंचवड शहरातील सर्व राजकीय व सामाजिक संघटना यांच्या वतीने मा.मारुती भापकर व मा.मानव कांबळे यांच्या नेतृत्वाखाली RTE अंतर्गत प्रवेश नाकारणाऱ्या मुजोर शैक्षणिक संस्थांच्या विरोधात आज पिंपरी चिंचवड महानगरपालिका समोर आंदोलन करण्यात आले.यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,भोसरी विभाग प्रमुख मयूर जगताप,अभिजित लगाडे उपस्थित होते. यावेळी आंदोलनाची तात्काळ दखल घेत शिक्षण विभागाच्या वतीने अश्या मुजोर शाळांवर कारवाई करण्याचे पत्राद्वारे लेखी आश्वासन दिले...

पुढारी



आरटीई प्रवेशाबाबत महापालिकेच्या प्रवेशद्वारावर निदर्शने करताना सामाजिक संघटना व कार्यकर्ते.

# आरटीई प्रवेश नाकारणाऱ्या शाळांविरोधात संस्थांची एकजूट

**पिंपरी :** मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत, पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शिक्षण संस्था नकार देत आहेत, अशा शिक्षण संस्थांवर कारवाईच्या मागणीसाठी शहरातील सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांच्या वतीने महापालिकेच्या प्रवेशद्वारावर निदर्शने केली.

यावेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण शुल्कामध्ये ५० टक्के सवलत द्यावी, आणि आरटीईच्या परताव्याच्या थकित रकमेच्या पन्नास टक्के रक्कम ताबडतोब संस्थांना अदा करावी, ही मागणी करण्यात आली. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, स्वराज अभियानचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मानव कांबळे, कैलास कदम, प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष विनोद गायकवाड, संभाजी ब्रिगेडचे सतीश काळे, कष्टकरी कामगार पंचायतीचे बाबा कांबळे, सामाजिक कार्यकर्ते संदिपान झोंबाडे, रयत विद्यार्थी विचार मंचचे धम्मराज साळवे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी मानव कांबळे म्हणाले की, ज्या शैक्षणिक संस्था जाणीवपूर्वक आरटीईचे प्रवेश नाकारत आहेत. त्या संस्थांवर प्रशासक नेमून आरटीईची प्रवेशप्रक्रिया करण्याची सुरुवात करावी. प्रशासन अधिकारी जोत्स्ना शिंदे यांनी संबंधित शिक्षण संस्थांवर कारवाई करण्याबाबतचे व आरटीई अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांपैकी कोणीही प्रवेशापासून वंचित राहणार नाही, असे लेखी आश्वासन देणारे पत्र आंदोलनकर्त्यांना दिले.


...्या विधी



...दगडू काळभोर
...ंत दुःख होत आहे की, दगडू काळभोर यांचे ./२०२१ रोजी दुःखद ...ांच्या पवित्र आत्म्यास हीच ईश्वरचरणी प्रार्थना.
...क्या विधी
...नांक २५/०७/२०२१ .०० वाजता, पद्मावती पिंपळी येथे होईल.
...काकुल
...नारायण बांदल (...वडाचीवाडी)
...गोपीचंद बांदल (...वडाची वाडी)
... दशरथ मासाळ (...योजक)
...तुळशीराम कामठे (...योजक)
...बाबासाहेब सातव (...योजक)
... गोपीचंद बांदल (...योजक)
... मासाळ, कामठे, ...ळभोर परिवार


My Pimpri Edition
Jul 23, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in










**दिनांक २३ जुलै २०२१**
**रक्तदान शिबिर**

सातारा कराड येथे अक्षय चव्हाण पश्चिम महाराष्ट्र प्रभारी अध्यक्ष यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. रक्तदान शिबिरला पदाधिकारी व मित्रमंडळी यांनी उत्तम प्रतिसाद दिला.covid १९ च्या प्रादुर्भावामुळे रक्ताचा तुटवडा राज्यात आहे.याची जाणीव ठेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. महालक्ष्मी ब्लड बँके च्या वतीने वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते.





**दिनांक १७ ऑगस्ट २०२१**


रयत विद्यार्थी विचार मंच च्या आव्हानाला साथ देऊन युवा नेते हर्षवर्धन दादा ओव्हाळ यांनी संस्थेस ५ डझन वह्या ३ पेन बॉक्स अश्या शैक्षणिक साहित्य व विद्यार्थ्यांसाठी मास्क आणि सॅनिटायझर दिले.यावेळी मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे मावळ तालुका उपाध्यक्ष सागर गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते संतोषदादा भालेराव व हर्षवर्धन दादा ओव्हाळ मित्र परिवार उपस्थित होते...



**दिनांक ०६ सप्टेंबर २०२१**

**अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी**

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) (लोणावळा) यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी लोणावळा शहर प्रमुख प्रणाली देविदास कावरे यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण केले महिला आणि मुली केवळ चुली पुरत्या मर्यादित नसून त्या राज्य सुद्धा उत्तम पध्दतीने चालवू शकतात हे दाखवून देणाऱ्या अहिल्याबाई होळकरयांना वैचारिक अभिवादन करून आपले मत व्यक्त केले...
यावेळी लोणावळा शहर महासचिव प्राजक्ता मानकर, लोणावळा शहर संयोजक अजिंक्य परब, लोणावळा शहर सहाकर्याध्यक्ष सिद्धी प्रजापती, लोणावळा शहर सहसचिव स्वप्ना आंबेकर आदी जन उपस्थित होते.



विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी चालवलेला मंच

**रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य)**

रजि.नं.: महा./१७८६/२०१७/पुणे

✲ संस्थापक/अध्यक्ष ✲
धम्मराज साळवे
(मो.: ८०८७५४०३८४)

✲ महासचिव ✲
संतोष शिंदे
(मो.: ९६०६६८३६५९)

जावक क्र.:

दिनांक :

प्रति,

दि. – 20/09/2021

मा.महासंचालक
डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

**विषय :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजने संदर्भात**

महोदय,

इयत्ता 10 वी मध्ये 90 टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत अश्या अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांसाठी बार्टी पुणे च्या वतीने भारतरत्न. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना चालू करण्यात आली आहे.

परंतु बार्टीने दिलेल्या सूचनेप्रमाणे विद्यार्थ्यांनी Documents Self Attested (स्वतःची सही न केल्यामुळे) नसल्याकारणाने त्याचबरोबर योग्य ते कागदपत्रे जोडण्यात न आल्यामुळे व इतर कारणांमुळे खूप अर्ज रिजेक्ट करण्यात आले आहेत.

बार्टी पुणे पुरस्कृत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजनेचा अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी खूप फायदा होऊ शकतो.त्यामुळे विद्यार्थ्यांचे अर्ज रिजेक्ट न करता त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.विद्यार्थी पालक यांना योग्य ती माहिती नसल्यामुळे तसेच काही त्रुटी असल्या कारणाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजनेसपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये या करिता या योजनेस अजून 15 दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी अशी आपणास रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने नम्र विनंती करत आहोत..


आपले विश्वासू

धम्मराज साळवे
संस्थापक/अध्यक्ष

संतोष शिंदे
प्रदेश महासचिव

पत्रव्यवहाराचा पत्ता : गांधीनगर, पिंपरी, पुणे – ४११ ०१८. ई-मेल : rayatvvmanch@gmail.com

CS Scanned with CamScanner



विषय :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजने संदर्भात Add label

Santosh Shinde Yesterday
to dg

प्रति,
मा.महासंचालक
डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

महोदय,

इयत्ता 10 वी मध्ये 90 टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत अश्या अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांसाठी बार्टी पुणे च्या वतीने भारतरत्न. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना चालू करण्यात आली आहे.

परंतु बार्टीने दिलेल्या सूचनेप्रमाणे विद्यार्थ्यांनी Documents Self Attested ( स्वतःची सही न केल्यामुळे ) नसल्याकारणाने त्याचबरोबर योग्य ते कागदपत्रे जोडण्यात न आल्यामुळे व इतर कारणांमुळे खूप अर्ज रिजेक्ट करण्यात आले आहेत.

बार्टी पुणे पुरस्कृत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजनेचा अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी खूप फायदा होऊ शकतो.त्यामुळे विद्यार्थ्यांचे अर्ज रिजेक्ट न करता त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.विद्यार्थी पालक यांना योग्य ती माहिती नसल्यामुळे तसेच काही त्रुटी असल्या कारणाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजनेसपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये या करिता या योजनेस अजून 15 दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी अशी आपणास रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने नम्र विनंती करत आहोत..

आपले विश्वासू

धम्मराज साळवे संस्थापक/अध्यक्ष
संतोष शिंदे प्रदेश महासचिव

New Doc...4_1.jpg

## दिनांक २१ सप्टेंबर २०२१

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना बार्टी महासंचालक यांना निवेदन

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजनेला १५ दिवस मुदतवाढ देण्यात यावी व विद्यार्थ्यांचे अर्ज रिजेक्ट न करता योग्य मार्गदर्शन करून सर्व विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा या विषयाचे ईमेलद्वारे बार्टी पुणे महासंचालक धम्माज्योती गजभिये यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने निवेदन देण्यात आले.. त्यांनतर तात्काळ दखल घेत ८ दिवसाची मुदतवाढ देण्यात आली होती.








दिनांक २८ सप्टेंबर २०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील रुग्णालयाचे खाजगीकरण करण्यात येत असून त्यासाठी कोविड योद्धा बचाव समिती यांच्या वतीने महानगरपालिकेच्या समोर धरणे आंदोलन चालू असून त्यांच्या या आंदोलनाला रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला तसेच खाजगीकरणाचा निर्णय रद्द करावा. यासाठी संस्थेच्या वतीने महानगरपालिका आयुक्त व सहा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर, प्रदेश महासचिव संतोष शिंदे,भोसरी विभाग प्रमुख मयूर जगताप,पिंपळे गुरव प्रमुख स्वराज कांबळे सदस्य किशोर शेळकंदे उपस्थित होते.



दिनांक २८ सप्टेंबर २०२१

रयत विद्यार्थी विचार मंच मावळ लोणावळा शहर यांच्या वतीने शहिद भगतसिंग यांना जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.





**दिनांक ३० सप्टेंबर २०२१**

**उर्दू शाळेच्या समस्या संदर्भात मार्गदर्शन करताना**

जाधववाडी उर्दू प्राथमिक शाळा येथे पालक सभेत पालकांच्या उर्दू शाळेच्या समस्या संदर्भात मार्गदर्शन करताना रयत विद्यार्थी विचार मंच अध्यक्ष धम्मराज साळवे.





दिनांक ०२ नोव्हेंबर २०२१

सिंघम अधिकारी ,पोलीस निरीक्षक राजेंद्र निकाळजे सर यांनी देहूरोड पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक(गुन्हे) चार्ज घेतल्यानंतर सविधान प्रस्ताविक देऊन सन्मान करताना







**दिनांक ०२ ऑक्टोबर २०२१**

**रयत विद्यार्थी विचार मंच लोणावळा टीम**

**महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती**

रयत विद्यार्थी विचार मंच लोणावळा कार्यकारणीच्या वतीने आज लोणावळा शहरात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर लोणावळा शहर अध्यक्ष प्रणाली कावरे मॅडम यांच्या हस्ते या दोन महापुरुषांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी पदाधिकारी यांनी महापुरुषांच्या विचारांवर मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



दिनांक ०५ ऑक्टोबर २०२१

"महिलांवर वाढत चाललेल्या अत्याचारांच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी त्यावर कोणत्या उपाय योजना केल्या पाहिजेत यासंदर्भात मार्गदर्शक सूचना संदर्भात पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त मा कृष्ण प्रकाश सर यांची सदिच्छा भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतीश कदम, रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर, महासचिव संतोष शिंदे उपस्थित होते".



**दिनांक ०६ ऑक्टोबर २०२१**

**रयत शिक्षण संस्थेच्या पाठीशी**

रयत शिक्षण संस्था ही शैक्षणिक संस्था कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरु केली आहे. कोणताही भेदभाव न करता आणि समाजातल्या गरिब, वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाची कवाडे कर्मवीर अण्णांनी खुली करून दिली. तेच कार्य आजही संस्था अविरतपणे करत आहे. हा विश्वास या संस्थेच्या कोणत्याही शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा आहे. असे असताना संस्था आणि महात्मा फुले महाविद्यालयाला विनाकारण बदनामी सुरु असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.त्यामुळे रयत विद्यार्थी विचार मंच हि रयत शिक्षण संस्थेच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. अश्या आशयाचे पाठिंबा पत्र रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आज महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी मा.प्राचार्य पांडुरंग गायकवाड सर यांना भेटून दिले.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर, प्रदेश महासचिव संतोष शिंदे,प्रदेश सचिव नीरज भालेराव,माजी विद्यापीठं प्रतिनिधी बुद्धभूषण गायकवाड व अन्य विद्यार्थी उपस्थित होते.





दिनांक ०७ ऑक्टोबर २०२१

पुणे लोहमार्ग पोलिस अधिकारी अमरदिप साळुंखे सर यांची सदिच्छा भेट घेतली यावेळी त्यांनी कार्याची दखल घेत कौतुक केले.










## दिनांक २१ ऑक्टोबर २०२१
## रयत विद्यार्थी विचार मंच लोणावळा

रयत विद्यार्थी विचार मंच लोणावळा शहर यांच्याकडून लोणावळा येथील डोंगरगाव जिल्हा परिषद शाळेतील मुलांशी दसरा आणि कोजागिरी निमित्त संवाद साधण्यात आला. मुलांशी ओळख करून त्यांच्यासोबत मनोरंजनात्मक खेळ घेऊन एक स्नेहपूर्ण नातं जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी मुलांसाठी खाऊवाटप कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी लोणावळा शहर प्रमुख प्रणाली कावरे, लोणावळा शहर उपाध्यक्ष धनश्री गाडे, लोणावळा शहर महासचिव प्राजक्ता मानकर, लोणावळा शहर संयोजक अजिंक्य परब, लोणावळा शहर खजिनदार स्नेहल साळवी,सहखजिंदर समृध्दी निकुडे, लोणावळा आदी जन उपस्थित होते..









**दिनांक १४ नोव्हेंबर २०२१**

**रयत विद्यार्थी विचार मंच लोणावळा**

**बालदिन साजरा**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगाव , लोणावळा येथे लहानग्यांसह बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याच बरोबर देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी करण्यात आली. बालदिनाचे महत्व काय ? आणि आज तो का साजरा केला जातो या बद्दल माहिती देण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश सचिव अमर अमर शोभा श्याम मुनेश्वर लोणावळा शहर प्रमुख - प्रणाली कावरे लोणावळा शहर कार्याध्यक्ष - सोनल म्हसकर, लोणावळा शहर संयोजक - अजिंक्य परब उपस्थित होते.









## दिनांक १५ नोव्हेंबर २०२१

**बालदिनाचं** औचित्य साधून रयत विद्यार्थी विचार मंच मावळ तालुका अध्यक्ष अतुल वाघमारे, सदस्य विशाल प्रधान यांनी खेड तालुक्यातील शेल पिंपळगाव येथील संपर्क बालग्राम या बालगृहास भेट देऊन मुलांशी संवाद साधला . मुलांना खाऊ आणि संस्थेला संविधान प्रस्ताविकेची प्रतिमा भेट दिली. यावेळी श्री.प्रभाकर खंडारे सर, श्री . राजरत्न कांबळे सर व विद्यार्थी उपस्थित होते.....!



## दिनांक २६ नोव्हेंबर २०२१

संविधान दिनानिमित्त औरंगाबाद नगरीचे लोकप्रिय खासदार मा.इम्तियाज जलील साहेब यांना मुंबई या ठिकाणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भारतीय संविधान प्रास्ताविका भेट देण्यात आली.यावेळी साहेबांना संस्थेच्या कार्याविषयी माहिती सांगितली.साहेबांनी संस्थेच्या कामाचे कौतुक केले.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,उपस्थित होते.







## दिनांक २६ नोहेंबर २०२१

## संविधान दिन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने संविधान दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक पिंपरी या ठिकाणी पिंपरी चिंचवड शहाराच्या महापौर मा.माई ढोरे , पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त मा.राजेश पाटील तसेच भोसरीचे विद्यमान आमदार मा.महेशदादा लांडगे यांना भारतीय संविधान प्रास्ताविका भेट देण्यात आली.यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,भोसरी विभाग प्रमुख मयूर जगताप,अभिजित लगाडे उपस्थित होते.












## दिनांक २८ नोव्हेंबर २०२४
## महात्मा जोतिबा फुले स्मृतिदिनी अन्न दान

विशाल भाऊ कांबळे आणि मित्र परिवार यांच्या वतीने रस्त्यावरील गरजू गरिबांना अन्न दान करण्यात आले.









**दिनांक ०६ डिसेंबर २०२१**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिम्मित

एक वही एक पेन पिंपरी या ठिकाणी राबवण्यात आले







## दिनांक ०६ डिसेंबर २०२१

## महामानवाला वही आणि पेन देऊन अभिवादन

सहभाग पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश सर,DCP मंचक इप्पर

संकलक- रयत विद्यार्थी विचार मंच

# डॉ. आंबेडकर यांना पिंपरीत अभिवादन

पिंपरी, दि. ७ (प्रतिनिधी) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी अभिवादन रॅली, संविधान प्रास्ताविकेचे वाचन आदी कार्यक्रम झाले.

सफाई कामगार आणि महाराष्ट्र कष्टकरी कामगार पंचायतीच्या वतीने मेणबत्ती लावून अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाराष्ट्र कष्टकरी कामगार पंचायतीचे अध्यक्ष बाबा कांबळे, रिपब्लिकन युवा मोर्चाचे नेते राहुल डंबाळे, बळीराम काकडे, घरकाम महिला सभा अध्यक्षा आशा कांबळे, सफाई कामगार महिला संघटनेच्या नेत्या मधुरा डांगे, रुक्मिणी कांबळे, सनी कांबळे आदी उपस्थित होते. संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

**मराठा सेवा संघाकडून अभिवादन**

मराठा सेवा संघाच्या वतीने



**दापोडी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मान्यवरांनी आदरांजली अर्पण केली.**

पिंपरीतील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण रानवडे, प्रकाश जाधव, सचिन दाभाडे, गोविंद खामकर, सुभाष देसाई, स्मिता म्हसकर, सुनीता शिंदे आदी उपस्थित होते.

**पिंपरीत रक्तदान शिबिर**

समता सैनिक दल पिंपरी चिंचवड विभागाच्या वतीने पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे रक्तदान शिबिर व कोविड लसिकरणाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी १९१ रक्त बॅगेचे संकलन झाले. तसेच करोना प्रतिबंधक लस ९० जणांना देण्यात आली. समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.


**वही पेनाचे संकलन**

रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने पिंपरीतील भीमसृष्टी स्मारक येथे एक वही, एक पेन संकलन करण्यात आले. या उपक्रमास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, नगरसेवक संजय वाबळे, माजी नगरसेवक शेखर ओव्हाळ यांनी या उपक्रमास भेट दिली. तसेच सर्वांनीच उपक्रमात सहभागी होत शैक्षणिक साहित्य दिले. संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, भोसरी विभाग प्रमुख मयूर जगताप, जैद मोमिन, जय लोखंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**पुनावळे येथे अभिवादन**

पुनावळे येथील श्रीमती अनुसाई ओव्हाळ माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद ओव्हाळ, विश्वास ओव्हाळ, गणेश गवळी आदी उपस्थित होते. दिव्या पोटभरे, दिव्या कांबळे, अंजली आडसे, मानसी खुने, धवल कांबळे आदी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. गायत्री वाहुळे, ऋतुजा पवार हिने सूत्रसंचालन केले. दीपक नेवाळे, योगेश ढावरे, दत्तात्रेय खैरनार, वनिता गायधने, राजू भालेराव उपस्थित होते.

# रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडून वही, पेन संकलन



पिंपरी, ता. ७ : महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर करून रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्यावतीने पिंपरी भीमसृष्टी स्मारक येथे एक वही-एक पेन संकलन करण्यात आले.

उपक्रमास पोलिस आयुक्त कृष्णप्रकाश यांनी भेट दिली. उपक्रमाचे कौतुक करून त्यांनी शैक्षणिक साहित्य देऊन सहभागी झाले. तसेच पिंपरी मतदार संघाचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार, विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, नगरसेवक संजय वाबळे, माजी नगरसेवक शेखर ओव्हाळ यांनी या उपक्रमास भेट देऊन कार्याचे कौतुक करत शैक्षणिक साहित्य दिले. संस्थेच्या वतीने जमा झालेले शैक्षणिक साहित्य गरीब गरजू विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. ज्या गरजूंना शैक्षणिक साहित्याची गरज आहे, अशा विद्यार्थ्यांनी संस्थेशी संपर्क साधावयाचा आहे.

लोकमत

# एक वही, एक पेन उपक्रम

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी भीमसृष्टी स्मारक येथे एक वही, एक पेन संकलन करण्यात आले. या उपक्रमास पिंपरी चिंचवड शहराचे पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी भेट दिली. यावेळी संघाचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार, विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, नगरसेवक संजय वाबळे, माजी नगरसेवक शेखर ओव्हाळ, संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, भोसरी विभाग प्रमुख मयूर जगताप, जैद मोमिन, जय लोखंडे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Dec 08, 2021
Powered by: erelego.com

## दिनांक ०६ डिसेंबर २०२१

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या एक वही एक पेन या उपक्रम घेण्यात आला होता. याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

पुढारी

# विद्यार्थ्यांसाठी आधारकार्ड कॅम्प उपलब्ध करून द्या

पिंपरी : पुढारी वृत्तसेवा

महापालिकेच्या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नाही. यामुळे विद्यार्थी व पालक यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासाठी सर्व महापालिकेच्या शाळेमध्ये मोफत आधार कॅम्प उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे करण्यात आली आहे.

याबाबत संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी आयुक्त राजेश पाटील व महापौर उषा ढोरे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या नियमानुसार जर विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नसेल तर तो विद्यार्थी म्हणून ग्राह्य धरला जात नाही. शासनाच्या डीबीटीसारख्या अनेक शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड आवश्यक झाले आहे. परंतु, अनेक विद्यार्थी यांच्याकडे आधारकार्ड नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत.

बाहेरील आधार केंद्रावर जाऊन आधारकार्ड काढण्यासाठी पालकांना वेळ मिळत नाही. बाहेरील आधार केंद्रांवर मोठ्या प्रमाणात गर्दी असते. अनेक दलाल लोक आधारकार्ड काढण्यासाठी जास्त रक्कम आकारतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आधारकार्ड बनवण्यासाठी विलंब लागतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते.

आधारकार्ड असले तर नाव, जन्मतारीख, पत्ता अशा दुरुस्ती आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्याने व आधारकार्डवरील दुरुस्ती यामुळे विद्यार्थी व पालक यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी महापालिकेच्या वतीने सर्व शाळेत आधारकार्ड नोंदणी, दुरुस्तीकरिता ऑपरेटर व यंत्रणा उपलब्ध करून मोफत आधार कॅम्प उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे.

My Pimpri Edition
Dec 16, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

## दिनांक १५ डिसेंबर २०२१

## मोफत आधार कॅम्प आयोजित करण्यात यावेत

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी यांना आधार कार्ड मुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत.आधार कार्डशिवाय विद्यार्थी ग्राह्य धरला जात नाही.DBT सारख्या अनेक योजना घेण्यासाठी विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागत आहे.यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सर्व शाळांत मोफत आधार कॅम्प आयोजित करण्यात यावेत यासंदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.आयुक्त व महापौर यांना निवेदन देण्यात आले.त्याची वृत्तपत्राने घेतलेली दखल.







दिनांक १५ डिसेंबर २०२१

महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब गरजू कुटुंबातील असतात.प्रत्येक वर्षी शाळा चालू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना २ ते ३ महिन्यानंतर उशिरा शैक्षणिक साहित्य मिळते,विद्यार्थ्यांना पावसाळ्यात स्वेटर व हिवाळ्यात रेनकोट अश्या पद्धतीने महापालिकेच्या शैक्षणिक विभागाचा भोंगळ कारभार चालतो.महापालिका व शिक्षण विभागाच्या या चुकीच्या कारभाराबाबत बुधवार दिनांक १५ डिसेंबर रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना गणवेश,पिटी गणवेश,स्वेटर,शैक्षणिक साहित्य लवकरात मिळावे या करिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महापालिकेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

**लोकमत**

# थंडीतही विद्यार्थ्यांना स्वेटर नाही

## विना गणवेश शाळा सुरू : रयत विद्यार्थी विचार मंचाचे आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : महापालिकेच्या शाळा उद्यापासून (गुरुवार) सुरू होणार आहेत. मात्र, विद्यार्थ्यांना अद्याप गणवेश मिळालेला नाही. हिवाळ्यातील थंडी वाजू लागली, तरी विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप झालेले नाही. गणवेश व स्वेटरसह प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना इतर शैक्षणिक साहित्य तातडीने द्यावे, या मागणीसाठी रयत विद्यार्थी विचार मंचाने महापालिका भवनासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन बुधवारी करण्यात आले. त्यानंतर महापालिका आयुक्तांना निवेदन दिले.




### शिक्षण विभागाची दिरंगाई

मुलांना शाळेचा गणवेश हाच त्यांचा दैनंदिन ड्रेस असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेशापासून वंचित ठेवण्याचे काम शिक्षण विभाग करत असल्याचा आरोप रयत विद्यार्थी मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी केला.

> कोविड काळात शाळा बंद असल्याने अद्याप गणवेश व स्वेटर खरेदी करण्यात आलेले नव्हते. आता शाळा सुरु झाल्यानंतर त्याविषयीचा प्रस्ताव देण्यात येईल.
>
> **- संदीप खोत, उपायुक्त, शिक्षण विभाग**

पिंपरी-चिंचवड शहर औद्योगिक नगरी म्हणून ओळखले जाते. महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये कामगार, मजूर, उपेक्षित-वंचित, गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांची मुले-मुली शिक्षण घेतात. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर गेली पावणे दोन वर्षे झाली तरी महापालिका शाळा बंद अवस्थेत आहेत. सध्या महापालिका ऑनलाईन शिक्षण देत आहे. या परिस्थितीत महापालिका शाळांमधून पूरक पोषण आहार विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन दिला जात आहे. मात्र, अद्यापह गणवेश, स्वेटरचे वाटप नाही.


Hello Pimpri Chinchwad
Page No. 8 Dec 16, 2021
Powered by: erelego.com



दिनांक १७ डिसेंबर २०२१

विश्वरत्न डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे नातू,भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय भीमराव आंबेडकर साहेब पिंपरी चिंचवड शहरात आले असता व त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची सदिच्छा भेट घेऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने त्यांना भारतीय संविधान प्रास्ताविका भेट देण्यात आली.



दिनांक १७ डिसेंबर २०२१

"जयंती सिनेमा"सध्या महाराष्ट्रभर प्रचंड धुमाकूळ घालतोय.जयंती सिनेमा मराठीत एक प्रबोधनाची क्रांती घेऊन आला आहे.अश्या या जयंती सिनेमाचे दिगदर्शक वैभव छाया व जयंती सिनेमाचे हिरो संत्या उर्फ ऋतुराज वानखेडे यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भारतीय संविधान प्रास्ताविका देऊन संपूर्ण जयंती सिनेमाच्या टीमला सदिच्छा दिल्या..






रयत विद्यार्थी विचार मंच






रयत विद्यार्थी विचार मंच
(महाराष्ट्र राज्य)


रयत विद्यार्थी विचार मंच
(महाराष्ट्र राज्य)
शुभेच्छा..!


रयत विद्यार्थी विचार मंच



### दिनांक २० डिसेंबर २०२१
### रयत विद्यार्थी विचार मंच वर्धापन दिन

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचा ४ था वर्धापन दिन साजरा साजरा करण्यात आला.यावेळी महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या पुढील वाटचालीबद्दल व कार्याबद्दल चर्चा करण्यात आली.







### दिनांक २९ डिसेंबर २०२१
### शैक्षणिक साहित्याची मदत


रयत विद्यार्थी विचार मंच वतीने गरजू ,होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत आज करण्यात आली.



**दिनांक ३० डिसेंबर २०२१ संस्थेच्या कार्याला शुभेच्छा धन्यवाद.**

आमदार अण्णा बनसोडे

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त पिंपरी विधानसभेचे विद्यमान आमदार मा.अण्णा बनसोडे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छापत्र दिले.....!



महाराष्ट्र विधानसभा

सदस्य, लोकलेखा समिती

विधानसभा महाराष्ट्र

अण्णा दादू बनसोडे

आमदार, पिंपरी विधानसभा

पिंपरी चिंचवड शहर

जा.क्र.:-D:AA\MLA CREDOC 2021\शिफारस\Dec\30

दिनांक :- ३०/१२/२०२१

## शुभेच्छापत्र

आयु. धम्मराज साळवे,आपण सुरू केलेल्या रयत विद्यार्थी विचार मंच ला चार वर्षे पूर्ण झाली आहेत त्याबद्दल आपले व आपल्या सर्व सहकार्याचे मनापासून हार्दिक अभिनंदन.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबडेकर म्हणतात शिक्षण हे वाघिनेचे दूध आहे जो पिणार तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. ही धमक शिक्षणात आहे.शिक्षण ही पिढी घडवण्याचे साधन आहे.व आजच्या परस्थिती मध्ये शिक्षण हे सहज मिळवता येत नाही त्यासाठी विद्यार्थ्यांना असंख्य अडचणींना तोंड दयावे लागते.विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम रयत विद्यार्थी मंच अतिशय उत्तमरीत्या करत आहे.पिंपरी या माझ्या विधानसभा मतदारसंघात स्थापना झालेल्या रयत विद्यार्थी विचार मंच चा प्रवास संपूर्ण महाराष्ट्र भर होत आहे याचा मला अभिमान आहे.गरीब गरजू विद्यार्थ्यांना आपण करत असलेले मदतकार्य उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे.पुढील काळात देखील आपले हे कार्य अविरतपणे सुरू व्हावे यासाठी शुभेच्छा!!!!

अण्णा बनसोडे

आमदार, पिंपरी विधानसभा

पिंपरी चिंचवड पुणे

कार्यालय :- आमदार अण्णा बनसोडे जनसंपर्क कार्यालय, प्रदीप स्वीट जवळ, चिंचवड स्टेशन, पुणे - ४११०१९

Website : www.annabansode.com Email : mla206pimpri@gmail.com


Thank
you